# उल्हासनगर महानगरपालिका

**मालमत्ता कर विभाग**

मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र

Tel No:- 95251-2720116 /125 Ext. No. 238 Fax No:- 95251-2720104


**[महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे अनुसूची ड चे प्रकरण ८ (कराधान नियम) मधील नियम २१ (१३ व १५ सह)]**

## जाहीर नोटीस

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील इमारती व जमिनी यावरील सामान्य कर तसेच इतर कर निर्धारणासाठी वर्ष २०२२-२०२३ करीताचे कर आकारणी पुस्तकातील नोंदी खालील मालमत्ता वगळता उर्वरीत सर्व मालमत्तांसाठी वर्ष २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाकरीता कर आकारणी नोंदी म्हणुन स्विकारण्याचे प्रस्तावित आहे.

(अ) ज्या मालमत्तांच्या क्षेत्रफळ/बांधकाम प्रकार/वापर इ. बाबींत बदल झालेला आहे.

(ब) ज्या मालमत्तांची पुर्नबांधणी झालेली आहे किंवा नवीन बांधकाम करण्यात आलेले आहे.

उपरोक्त आकारणी पुस्तकातील नोंदी घरमालक/त्यांचे प्रतिनिधी/अभिकर्ता/भोगवटाधारक यांना पाहणीसाठी कार्यालयीन वेळेत महानगरपालिका कर विभागात उपलब्ध आहेत. उपरोक्त नोंदीसंदर्भात खालील बाबींवर हरकत असल्यास, ती, दिनांक १२/०४/२०२३ पासुन दिनांक ०३/०५/२०२३ या कालावधीत लेखी स्वरुपात योग्य त्या कारणासह सादर करावयाची आहे.

(१)जमिनीचे किंवा इमारतीचे मूल्य चुकीचे ठरवण्यात आले असेल किंवा कर आकारणी चुकीची करण्यात आली असल्यास,

(२)घरक्रमांक अथवा चुकीचा/अपुरा पत्ता नोंद असल्यास,

(३)मालमत्ता कर देण्यास प्रथमतः जबाबदार असलेल्या व्यक्तींचे नाव चुकीचे/अपुरे नोंद असल्यास,

(४)मालमत्ता कर देण्यास प्रथमतः जबाबदार असलेल्या व्यक्तींचे नाव काढुन टाकणे अथवा कमी करावयाचे असल्यास,

(५) जमिनी अथवा इमारतीचे भाडेमुल्यात वाढ अथवा घट झाली असल्यास,

(६) इमारत अथवा तिचा काही भाग पाडुन टाकला असल्यास किंवा इमारत अस्तित्वात नसल्यास,

सदर हरकती / तक्रारी अर्ज खाली सही करणार यांचे नावे नागरिक सुविधा केंद्र (मुख्यालय) उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर-३ येथे देवुन त्याची रीतसर पोहोच घ्यावी.

(७)अर्जामध्ये मालमत्ता क्रमांची नोंद आवश्यक असुन प्रत्येक मालमत्तांसदर्भात स्वतंत्रपणे तक्रार/हरकती अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

**टिप :- नागरिकांना त्यांचे मालमत्तेसंदर्भात हरकत /आक्षेप नसल्यास कर बिलाची प्राप्ती तसेच भरणा करणेकामी महानगरपालिका संकेतस्थळ** www.umc.gov.in **येथे पर्याय उपलब्ध आहे.**

**दिनांक ११/०४/२०२३**

**जा. क्र. उमपा/**करवि/०३/२३.

**(अजीज शेख)**

**प्रशासक तथा आयुक्त**

**उल्हासनगर महानगरपालिका**

**उल्हासनगर महानगरपालिका**
**मालमत्ता कर विभाग**
मुख्य कार्यालय, तळमजला, उल्हासनगर-४२१ ००३ जिल्हा ठाणे, महाराष्ट्र
Tel No:- 95251-2720116 /125 Ext. No. 238 Fax No:- 95251-2720104

**[महाराष्ट्र इमारतीवर कर (मोठया निवासी जागांसह) (पुन्हा अधिनियम करणे) अधिनियम १९७९ मधील कलम १० (१)]**

# जाहीर नोटीस

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील मोठया निवासी जागा असलेल्या इमारती व त्यांचे करयोग्य मूल्य दर्शविणारे वर्ष २०२३-२०२४ करीताचे कर आकारणी पुस्तक मालमत्ता कर विभागात कार्यालयीन वेळेत पाहण्याकरीता ठेवण्यात आले आहे. सदर पुस्तकात समाविष्ट करण्यात आलेल्या मोठया निवासी जागांचे मालक किंवा ताबेदार असलेल्या प्रत्येक व्यक्तीस आणि अशा व्यक्तीच्या कोणत्याही प्रतिनिधीस सदर पुस्तकाची तपासणी करण्याची मुभा आहे. कर आकारणी पुस्तकात नमुद केलेले करयोग्य मुल्य, आकारणी किंवा इतर नोंदी यासंबंधी मोठया निवासी जागेचे मालक किंवा ताबेदार यांच्या हरकती किंवा तक्रारी असतील तर अशा मालक किंवा ताबेदारास किंवा मालकाच्या किंवा ताबेदाराच्या प्रतिनिधीने हरकती किंवा तक्रारी, कारणांसह दिनांक ०३/०५/२०२३ पर्यंत खाली सही करणार यांचे नावे उल्हासनगर महानगरपालिका मालमत्ता कर विभागात लेखी पाठवाव्यात.

## विशेष सुचना

(१)मोठया निवासी जागेवरील कर आकारणी विरुध्द् केलेला तक्रारी अर्ज संबंधीत कर आकारणी प्राधिकरण कार्यालयात पोहोचला याबद्दल लेखी पावती जरुरी आहे. पाठविलेला अर्ज कर आकारणी प्राधिकरण कार्यालयात न पोहोचल्यास त्याची जबाबदारी कर आकारणी प्राधिकरण कार्यालयावर राहणार नाही.

(२)प्रत्येक मोठया निवासी जागेवरील कराबाबत स्वतंत्र अर्ज करावयास पाहिजे. ज्या मोठया जागेवरील कराबाबत तक्रारी अर्ज करावयाचा असेल त्या मोठया निवासी जागेचे वर्णन विशेषत: सिटी सर्व्हे नंबर, प्रभाग क्रमांक, घर नंबर, ठिकाणी रस्त्याचे नाव वगैरे व आकारणी प्राधिकरणाने ठरविलेले करयोग्य मुल्य इ. माहिती अर्जात नमुद केली पाहिजे.

(३)वरील कर हा ज्या निवासी जागेचे चटई क्षेत्र १५० चौ.मीटर पेक्षा जास्त व ज्यांचे करयोग्य मुल्य रु. १५००/- पेक्षा अधिक आहे, अशा फक्त निवासी जागांना हा कर त्यांच्या करयोग्य मुल्याच्या परीणाम दर एवढस १० टक्के दराने लागु आहे.

(४)अर्जामध्ये मालमत्ता क्रमांची नोंद आवश्यक असुन प्रत्येक मालमत्तांसदर्भात स्वतंत्रपणे तक्रार/हरकती अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

**टिप :- नागरिकांना त्यांचे मालमत्तेसंदर्भात हरकत /आक्षेप नसल्यास कर बिलाची प्राप्ती तसेच भरणा करणेकामी महानगरपालिका संकेतस्थळ** www.umc.gov.in **येथे पर्याय उपलब्ध आहे.**

**दिनांक११ /०४/२०२३**
**जा. क्र. उमपा/** करवि/०४/२०२३.

**(अजीज शेख)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**उल्हासनगर महानगरपालिका**